# प्रेसनोट

दि.०९/०३/२०२०

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | कोतवाली पो.स्टे., जि.अहमदनगर गुरनं.५६८/२०२० |
| कलम | ला.प्र.का. सन १९८८ (संशोधन) सन २०१८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | सुनिल बाबुराव फापाळे, वय ४८ वर्ष, अव्वल कारकुन, कुळकायदा शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये ५०,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | --- |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार व त्यांचे १६ इतर हक्कदार खंडकरी शेतकरी आहेत. शासनाने खंडकरी शेतक-यांना जमीन परत देण्याचे धोरण अवलंबले असल्याने तक्रारदार व त्यांच्या १६ इतर हक्कदार यांनी शेती महामंडळाकडे अर्ज दाखल केला होता. त्यानुसार शेती महामंडळाने तो अर्ज पुढील कारवाईसाठी प्रांताधिकारी, श्रीरामपूर यांचेकडे पाठविला. त्यानंतर प्रांताधिकारी श्रीरामपूर यांनी तक्रारदार यांच्या प्रकरणाची चौकशी करुन सदरचे प्रकरण मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे कार्यालयात पाठविले. सदर खंडकरी जमीनीचे प्रकरणात मदत करुन प्रकरण मंजुर करुन देणेसाठी यातील आरोपी लोकसेवक सुनिल बाबुराव फापाळे, वय ४८ वर्ष, अव्वल कारकुन, कुळकायदा शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय,अहमदनगर यांनी दि.३/३/२०२० रोजी लाच मागणी पडताळणी दरम्यान पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडे ५०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन ती कुळ कायदा शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आणुन देण्यास सांगुन ती लाचेची रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शविली म्हणून आरोपी लोकसेवक सुनिल बाबुराव फापाळे यांच्याविरुध्द कोतवाली पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ (संशोधन) सन २०१८ चे कलम ७ प्रमाणे आज दि.०९/०३/२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in

ई-मेल :- acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :- १०६४

दुरध्वनी क्रमांक :- ०२४१-२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:- ९९३०९९७७००


(हरीष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर

Scanned by CamScanner